98 ?

अंतरी पेटवू ज्ञानज्योत
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

जा.उमवि/12/phybos/ 4456 /97 दिनांक :- 24.10.1997

प्रति,

मा.परीक्षा नियंत्रक,
उमवि, जळगांव.

विषय :- फिजिक्स अभ्यासमंडळाच्या सभेतील शिफारसीबाबत.
संदर्भ :- दिनांक 14.10.1997 रोजी संपन्न झालेली फिजिक्स अभ्यासमंडळाची सभा.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने विदित करण्यात येते की, दिनांक 14.10.1997 रोजी फिजिक्स अभ्यासमंडळाची सभा संपन्न झाली असता, सदर सभेतील विषय क्र.4 अन्वये परीक्षेच्या संदर्भात शिफारसी करण्यात आलेल्या असून, सदरच्या शिफारसी या पत्रासोबत आपल्या माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविल्या आहेत.

कळावे,

आपला विश्वासू,
उपकुलसचिव

सोबत :- वरीलप्रमाणे.

प्रत माहितीसाठी रवाना :-
मा.उपकुलसचिव,
परीक्षा-पूर्वार्ध विभाग,
उमवि, जळगांव.

Phy अभ्यासमंडळ

.mt

## फिजिक्स अभ्यासमंडळाच्या सभेतील शिफारसी

विषय क्र.4 :-

एप्रिल, 1997 मध्ये झालेल्या परीक्षेच्या प्रश्नपत्रिकांवर चर्चा करणे-

शिफारस :-

एप्रिल, 1997 मध्ये झालेल्या परीक्षेच्या प्रश्नपत्रिकांवर चर्चा करण्यात आली. तदअनुषंगाने परीक्षा मंडळासाठी खालील सुचना करण्यात आल्या.

1) विद्यापीठ कायदा, 1994 मधील कलम, 32(5) प्रमाणे नियुक्त केलेल्या परीक्षकांनी सेट केलेल्या प्रश्नपत्रिका त्यावर्षीच्याच मार्च व ऑक्टोबरच्या परीक्षांसाठी वापरण्यात याव्यात.

2) एम.एस्सी. प्रॅक्टीकल परीक्षेसाठी दोन्ही परीक्षक बहिःस्थ असल्या कारणाने रेम्युनरेटिव्ह लॅब सुपरवायझरची नेमणू करावी.

3) परीक्षांचे निकाल जाहीर करण्यापूर्वी संबंधित परीक्षांच्या मार्कस् सेटलिंगची तरतूद करण्यात यावी. या समितीत त्या परीक्षेचे चेअरमनसह पेपरसेटर्स व परीक्षक असे पांच सभासद असावेत.

4) सध्यस्थितीत असलेली प्रथम, द्वितीय चाचणी परीक्षा बंद करुन पदवी वर्गासाठी सत्रांत (Term-End) परीक्षा घेण्यात याव्यात. या परीक्षेसाठी 20 मार्कस् असावेत व वार्षिक परीक्षा 80 मार्कसची घ्यावी. ( 80-20 Patterm असावा).